ISSN: 2348-6449 https://bmb.ac.in/aura/ aurabmb@gmail.com

==========================================================================

# महाराष्ट्राच्या सत्यशोधक राजकीय संस्कृतीचा इतिहास

मंगेश वसंतराव कड्
भिवापूर महाविद्यालय, भिवापूर
जिल्हाः नागपूर
neelman1997@gmail.com

==========================================================================

राजकीय संस्कृती : वैयक्तिक आणि सामाजिक जीवनाचा व त्यासंबधीच्या व्यवहाराचा विचार करून लोक आपले वर्तन ठरवित असतात, असे वत र्न संस्कृतीच्या प्ररिप्रेक्ष्यातून पहिले जाते. संस्कृतीचा अर्थबोध होणे साधारणपणे गहन असले आणि त्याची व्याख्या करणे कठीण असले, तरी जीवनाच्या अनेक बाजु आहेत. त्यापैकी राजकीय जीवनाची बाजु महत्वाची आहे. राजकीय जीवनाच्या संदर्भात लोक एक दृष्टिकोण बाळगून असतात. त्यांच्या स्वतःच्या काही समजुती, विशिष्ट दृष्टिकोण, भावना असतात आणि त्या अनुषंगाने त्यांचे व्यवहार निर्धारीत होत असतात. त्यालाच त्या सामाजाची राजकीय संस्कृती असे म्हणतात. लोकांच्या ह्या श्रध्दा, निष्ठा, मूल्ये व स्फूर्ती केंद्रे ह्या सर्वांचा अंतर्भाव राजकीय संस्कृतीत होत असतो. श्रध्दा, निष्ठा, मुल्ये, प्रतिके, प्रेरणा दीर्घकाळाच्या संस्कार प्रकियेतून अंगी भिनल्या जातात. त्यातून होणारी राजकीय परिप्रेक्ष्याची निर्मिती आणि राजकीय नेणीवेच्या पातळीवर उमटणारे प्रतिसाद, राजकीय संस्कृतीचे प्रकारविशेष स्थिर-अस्थिर, सहभाग-असहभाग, एकजिनसी-बहुविध यावर अवलंबून असतात. आधुनिक राज्यशास्त्रांत नवीन संकल्पना, विश्लेषण पध्दती, संशोधन पध्दती मूल्य निर्धारक घटक आणि अशा अनेक पैलूंना महत्व प्राप्त झाले आहे. राज्यशास्त्राच्या अभ्यासकांना ह्या गोष्टी दुर्लक्षून आधुनिक प्रवाहात टिकून राहणे शक्यच नाही.

भारतीय राजकीय संस्कृतीत भाषा, धर्म, वंश व रितीरिवाज यावर आधारीत प्रत्येक प्रदेशाची एक उप-राजकीय संस्कृती दिसुन येते. अशा उप-राजकीय संस्कृतीला भारतीय राजकीय संस्कृती एका समानसुत्रात बांधणारी असल्यामुळे भारतीय राजकीय व्यवस्था ब-याच अंशी स्थिर स्वरूपाची झालेली आहे.

ISSN: 2348-6449 https://bmb.ac.in/aura/ aurabmb@gmail.com

राजकीय प्रक्रियेत लोकांच्या सहभागाचे प्रमाण शासनाकडून असणा-या अपेक्षांवर अवलंबुन असते. त्या आधारे राजकीय संस्कृतीचे 'सहभागांकीत राजकीय संस्कृती' आणि 'सहभाग अधीन राजकीय संस्कृती' असे वर्गीकरण आल्मंड आणि व्हर्बा यांनी केले आहे. भारतीय राजकीय संस्कृतीचा विचार दुस-या प्रकारच्या वर्गीकरणाला अनुसरून करता येईल.

<u>राजकीय संस्कृतीच्या व्याख्या :-</u>

रॉय मॅक्रेडीस असे म्हणतात की, ''एखाद्या राजकीय व्यवस्थेतील लोकांनी राजकीय जीवनासबंधी स्वीकारलेली समान ध्येय व नियम म्हणजे राजकीय संस्कृती होय.''1

----------------------------------

सिरसीकर व.म. : आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजया नगर, पूणे,2001, पु.4.

ल्युसियनच्या मते ''राजकीय संस्कृती म्हणजे राजकीय जीवनाची व्याप्ती, त्याची ध्येय, साधने व त्यांचा परस्परसंबंध तसेच राजकीय मुल्यमापनाची कसोटी इत्यादी घटकांनी परिपूर्ण अशी संस्कृती म्हणजे राजकीय संस्कृती होय.''2

तर ''राजकीय संस्कृती म्हणजे सत्ताधिकाराविषयी असलेल्या कल्पना, परंपरा, मूल्ये, श्रध्दा व भावना ह्यांचा, शासनसंस्थेने काय करावे? व कसे करावे? ह्यावर पडणारा प्रभाव होय.'' असे सॅम्युयल बीर यांचे मत आहे.3

राजकीय संस्कृती ही महत्वपूर्ण संकल्पना आहे. नागरिकाचे वर्तन आणि एखादया राजकीय व्यवस्थेची कार्यप्रवणता आणि अस्तित्व यांच्यामधील ती बुध्दिनिष्ट दुवा आहे. व्यक्तीच्या श्रध्दा, निष्ठा राजकीय संस्कृतीच्या मूलाधार असतात. राजकीय व्यवस्थेच्या कार्यावर त्याचा परिणाम होतो. ह्यामुळे ज्या व्यवस्थेत ह्या श्रध्दा व निष्ठा निर्माण होतात तिच्याशीच त्या निगडित असतात. त्या श्रध्दा व निष्ठा कशा निर्माण होतात? कुठल्या वातावरणात निर्माण होतात? हे ही त्या दृष्टीने महत्वाचे असते राजकीय संस्कृती स्थिर स्वरूपाची राहू शकत नाही. राज्यात होणारी विविध क्षेत्रातील स्थित्यंतरांमुळे राजकीय संस्कृतीचे स्वरूप बदलत असते. भारतातील दीर्घकाळापासूनची राजकीय स्थित्यंतरे, जागतिक बदलाचा परिणाम,

ISSN: 2348-6449 https://bmb.ac.in/aura/ aurabmb@gmail.com

भारतीय समाज व्यवस्था, परिवर्तनवादी चळवळी, प्रदेशिक वादविवादतेचा प्रभाव, प्रांतवाद, जमातवाद. इत्यादींचा भारतीय राजकीय संस्कृतीवर परिणाम होत आलेला आहे. परिणामतः उप-राजीकय संस्कृतीचेसुध्दा स्वरूप कलानुरूप बदलले आहे.

महाराष्ट्राची राजकीय संस्कृती :- भारतात, प्रत्येक प्रदेशाचे वेगळेपण दिसुन येते ते त्यांच्या इतिहासात, भौगोलिक घटक, भाषा, साहित्य, संत परंपरा आणि विविध चळवळीवरून महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीवर पेशवाईचा परिणाम झाला आहे. शिवकालीन राजकीय जीवनात पेशवेपदाला असलेले महत्व आणि नंतरच्या काळात शिवाजीच्या वंशंजांच्या कार्यकालामध्ये पेशवेपदाला अधिक बळकटी आली. कालांतराने पेशवे सर्वेसर्वा झाले. आणि मराठा साम्राज्याचा विस्तार ग्वाल्हेर, बडोदा, देवास, इंदूर, नागपूर, झाशी, तर दक्षिनेत तंजावर अशा महाराष्ट्राबाहेरील प्रदेशातही झाला. त्यामुळे एकेकाळी संपूर्ण हिंदुस्थानावर दबदबा निर्माण

करणा-या दिल्लीच्या मुघल सम्राटाला ही मराठा सत्तेची आठवण होऊ लागली. मराठी सत्तेचे झेंडे अटकेपार गाडले गेले. दक्षिणेत जिंजीला वेढा घालून काबीज करण्यात आले आणि तेथे ही सत्ता हस्तगत केली. भारतीय राजकीय जीवनावर मराठी सत्तेचा प्रभाव वाढत गेला. ‘पेशवे कोकणातून आलेले कोकणस्थ वा चित्पावन ब्राम्हण होते. 4 वाढत्या राजकीय प्रभावामुळे त्यांच्यात सजातीय अभिमान निर्माण झाला. वसाहती स्वरूपाची वाटणारी ब्रिटीश सत्ता भारताच्या अनेक भागांमध्ये विस्तारत होती. पेशव्यांचे प्राबल्य असलेल्या प्रदेशाकडे इंग्रजांनी लक्ष्य केंद्रीत करून इ.

--------------------------------------------------------------

2
कित्ता3
कित्ता4
कित्ता.

स. 1818 ला बाजीराव पेशव्याकडून राजसत्ता हिसकावून घेतली इ.स. 1818 ला पेशवाईचा अंत झाला. पेशवाईच्या काळात महाराष्ट्राचे राजकीय-सामाजीक जीवन खुपच प्रभावित झाले. इथली

सर्व सामान्य जनता हतबल झाली होती. ब्राम्हणांच्या दारात शिक्षणाची सर्वसत्ता एकवटली असल्यामुळे, आंग्लकाळात शिक्षणाचा फायदाही प्रथम त्यांनाच मिळाला. बहुजन समाज मात्र अज्ञानासह, जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये माघारी पडू लागला. सामाजिक जीवन फारच विदारक अवस्थेला पोहचले. जाती अंतर्गत व्यवहार कमालीचे शोषणकारी बनले होते. अस्पृश्यता ही समाजावरील कलंक ठरली. घरादारात वावरणा-या प्राण्यांपेक्षाही वाईट वागणूक अस्पुश्य जाती घटकांना मिळत होती. मध्यम जातींच्या व्यवहाराला मर्यादा पडत गेल्या. ह्याचा परिणाम महाराष्ट्रातील जनजीवन स्थितीशिल बनले. शैक्षणिक, सास्कृतिक, आर्थिक, भौतिक प्रगतीच्या वाटा जवळजवळ बंद झाल्या. खेडोपाडयातील जीवनपध्दती प्रभावित झाली.

मर्यादीत स्वरूपाचे लोकव्यवहार जीवन कुंठीत करून टाकणारे होते. ब्रिटीश शिक्षण पध्दतीमुळे आणि युरोपातील प्रबोधन चळवळीमुळे पारंपारीक रूढी पंरपरा, शोषण करणारी सांस्कृतिक मुल्ये, चातुवर्ण्य प्रणित व्यवस्थेतून निर्माण झालेले जातीय प्रश्न आदिंवर घणाघाती प्रहार करणारी नवीन पीढी भारतीय पटलावर पुढे येऊ लागली. बंगाल व इतर प्रातामध्ये सुधारणावादी चळवळींची पोळेमुळे अधीक खोलवर पसरू लागली. महाराष्ट्रात संत परंपरेच्या माध्यमातुन अंधश्रध्दा-रूढी-पंरपरा-अज्ञान दाभिक पुरोहितशाही यांच्या विरूध्द सुधारणावादी कार्याला चालना मिळून, परिवर्तनवादी चळवळी मुळ धरू लागल्या. महाराष्ट्रातील संतसंप्रदायाने सामाजीक वास्तावाचे आत्मभान मराठी माणसांमध्ये निर्माण करण्यास सुरूवात केली. आणि संपूर्ण महाराष्ट्रात नवचैतन्य निर्माण केले. वारकरी संप्रदायाने दींडी यात्रेच्या मध्यमातुन लोकांना घराबाहेर काढले. जाती व वतु ळींतील संकुचित जीवनपध्दतीच्या मर्यादेतुन महाराष्ट्रातील जनजीवन हळूहळू बाहेर पडू लागले. पेशवाईच्या काळत भोगाव्या लागणा-या मरणासन्न यातनांमधून सुटकेच्या प्रतिक्षेत असलेल्या जनसामान्यांच्या आशावादी जीवनदृष्टीला नविन पालवी फुटण्याची संभाव्यता त्यामुळे निर्माण झाली. सुधारणावादी चळवळीचे लोन महाराष्ट्रात पसरत असतांना पारंपांरीक सुधारणावादी आणि समग्र परिवत र्नाची क्रांतीकारी चळवळ अशा दोन पातळीवर कार्य चालु होते. उच्चवर्णीय सुधारण्यावाद्यांना आधुनिक संदर्भात

ISSN: 2348-6449 https://bmb.ac.in/aura/ aurabmb@gmail.com

समाजाच्या विकासाला बाध्य ठरणा-या रूढी-परंपरा-चालीरीती यांच्यात सुधारणा होणे महत्वाचे वाटत होते तर जातीव्यवस्थेवर आधारीत शोषण यंत्रणेचे विरोधात बंड केल्याशिवाय बहुजन समाजाचा विकास होणे शक्य नाही असा ठाम विश्वास बाळगणा-या समाजात क्रांतीकारांकंचा एक मोठा प्रवाह ही निर्माण झाला होता.

सत्यशोधक समाजाची स्थापना जोतीराव फुल्यांनी पुण्यातील तुकाराम नाईक ह्यांचे घर क्र.527 येथे 24 सप्टेबंर 1873 ला केली. 5 सत्यशोधक समाजाने त्यावेळी काही मूलतत्वे ठरविण्यात आली. सर्व माणसे निर्मिकाची लेकरे आहेत. त्याला प्रसन्न करण्यासठी कुठल्याही

-----------------------------------------------------------------

5 चोपडे डॉ. अशोक : विदर्भातील सत्यशोधक चळवळीचे साहित्य

मध्यस्थाची अथवा दलालाची गरज नाही. आईला विणविण्यास किंवा बापाला संतुष्ट करण्यास जशी लेकरास मध्यस्थिची जरूरत पडत नाही, तशी कल्पना ईश्वराची ओळख करून देण्यास व त्याला प्रसन्न करण्यास उपाध्याय किंवा धर्मगुरू ह्यांच्या मध्यस्थाची जरूरी नाही.

तत्पूर्वी जोतीबांनी शुद्रातिशुद्र समाजाच्या अधोगतीची कारण अविद्येत शोधून स्त्रीशुद्रातिशुद्रांसाठी शिक्षणची कवाडे उघडण्यासाठी कसोशीने प्रयत्न केले 1848 साली बुधवार पेठेत मुलींकरिता पहिली शाळा कढून त्यांनी स्त्री शिक्षणास आरंभ केला. 6 त्यानंतर अनेक शाळा स्थापन करून स्त्रिशुद्रातिशुद्रांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली उच्चवर्णीयांच्या विरोधाला न जुमानता निधडया छातीने शैक्षणिक कामचा रेटा चालु ठेवला. आंग्लकाळातील शिक्षणपध्दती मध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी आणि बहूजन समाजाचे अविद्येमुळे होणारे खस्ताहाल समाजावून सांगण्यासाठी हंटर आयोगासमोर बहूजन समाजाच्या शिक्षणाची कौफियत सादर केली. अविद्येने झालेले अज्ञान-अंधःविश्वास आणि त्याचा फायदा घेऊन भट-भिक्षुकांकडून धर्माच्या नावावर होणारे बहूजन समाजाचे शोषण यातून बहूजन समाजाला शिक्षणाबरोबरच प्रबोधनाची गरज आहे हे ओळखून, सत्यशोधक समाजाला ज्या तत्वज्ञानाची बैठक फुल्यांनी

ISSN: 2348-6449 https://bmb.ac.in/aura/ aurabmb@gmail.com

दिली. त्या आधारे चळवळीचे काम हळूहळू जनमानसांमध्ये पसरू लागले होते. सत्यशोधक समाजाचा विचार साहित्यातून समाजापर्यंत जावा ह्या हेतूने सत्यशोधक समाजाच्या पुढा-यांनी साहित्य निर्मितीलाही प्रामुख्याने प्राधान्य दिले. सत्याशोधक समाजाच्या अल्पशिक्षीत पण ग्रामीण जिवनाशी तद्रूप झालेल्या असंख्य प्रचारकांनी ह्या समाजाची मुल्ये जनतेपर्यंत पोहचवली परिणामदृष्टया राजकीय क्रांन्तीहूनही मोठी व मुलगामी अशा हि क्रांन्ती होती. 7 ज्योतीरावांच्या हयातीत चळवळीचे काम वेगाने वाढू लागले, अनेक पुढारी आणि कार्यकर्ते निर्माण झाले, बहूजन समाजाला नवी दिशा देणारा विचार महाराष्ट्रात पसरू लागला. शेटजी-भटजींच्या शोषणकारी मगरमीठीतुन सुटका करण्यासाठी सत्यशोधक समाजाने कार्यक्रम दिले. 25 डिसेंबर 1873 रोजी पूणे येथे सिताराम आनह्राट व राधाबाई निबेंकर ह्यांचा पहिला सत्यशोधक विवाह घडवुन आणला. 8 सांस्कृतीक-सामाजीक कार्यात भट-पुरोहिंताच्या उपस्थितीशिवाय कार्ये उरकून घेण्याचे प्रयत्न सुरू झाले. विदर्भातही पुढील काळात सत्यशोधक समाजाचे कार्य मोठया प्रामणात उभे राहीले. कृष्णराव भालेकर, नारायण मेघाजी लोखंडे आणि इतर सहका-यांनी व्यापक स्वरूपात चळवळीचा रेटा वाढवण्यास मदत केली. ह्या देशातील कष्टकरी-शेतकरी- कामगार इत्यांदिचे शोषण थांबले पाहिजे, हीच तळमळ मुळाशी ठेवुन नारायण मेघाजी लोखंडे ह्यांनी कामगार चळवळ उभी केली. मुबंईमधील गिरणी कामगारांचे शोषण थांबले पाहिजे ह्यास्तव कामगारांमध्ये जागृती निर्माण करून गिरणी कामगरांची पहिली ऐतिहासीक जाहीर सभा सुपारीक्त परळ येथे 23/09/1884 झाली सततच्या गिरणी कामामुळे कामगाराच्या आरोग्याला होणारा अपाय आणि

-----------------------------------------------------------

6 फडके य. दि. : महात्मा फुले समग्र वाडमय

7 भोडे भास्कर लक्ष्मण : शेतकरी कामगार पक्ष, आचार्य पदवी करीता नागपूर विद्यापीठ राज्यशास्त्र विभागात सादर केलेला प्रबंध. 1981 पु.4.

8 कदम मनोहर : नारायण मेघाजी लोखंडे पु.41.

त्यामुळे होणारी कुटूंबाची अवस्था लक्षात घेता कामगारांना साप्ताहीक सुट्टी मिळावी यासाठी प्रयत्न केले. रविवार दि. 10जुन 1890 ला बॉम्बे मिल ओनर्स असोशिएशनने कामगारांना दर रविवारची सुट्टी देण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय म्हणजे भारतातील कष्टकरी शक्तीच्या एकजुटीचा पहिला विजय होय. 20 व्या शतकाच्या सुरवातीस स्वातंत्र्य चळवळीचे काम गती घेऊ लागले होते. राजकीय स्वातंत्र्य किती महत्वाचे आहे आणि त्याची कशी आवश्यकता आहे, ब्रिटीश राजवटीमुळे हिंदुस्थानची जनता किती अन्याय्य प्रकारचे जीवन जगत आहे हे समजवून सांगत 'राष्ट्रीय सभेचे' स्वातंत्र्य आंदोलन चालू होतेच. त्याचवेळी सामाजीक सुधारणा कशा आवश्यक आहे. ह्या संबंधीचाही विचार मोठया प्रमाणात पुढे येत होता. आधी राजकीय सुधारणा की आधी राजकीय स्वातंत्र्य ह्या वादंगामध्ये सामाजीक परिवर्तनाचे कार्य अव्ययहृतपणे चालू होते. 20व्या शतकाच्या प्रारंभी सत्यशोधक चळवळीला शाहू महाराजांचा भक्कम आधार मिळाल्यानंतर सत्यशोधक चळवळीचे कार्य अधिक प्रभावीपणे महाराष्ट्रात कानाकोप-यात पोचलेले दिसुन येते.

शाहू महाराज कोल्हापूरच्या गादीवर 2 एप्रील 1894 ला विराजमान झाले. ''आम्हची सर्व प्रजा सतृप्त राहुन सुखी असावी तिच्या कल्यानाची सतत वृध्दी व्हावी व आम्हचे संस्थानाची हरेकप्रकारे सदोदीत भरभराट होत जावी, अशी आम्हची इच्छा आहे. हा आम्हचा हेतु परिपूर्ण करण्यास आम्हच्या पदरचे वर्स लहानथोर जाहांगीरदार, सरदार, माणकरी, ईनामदार, कामगार, व्यापारी आणि तमांम प्रजाजन शुध्द अंतःकरणातुन मोठया राजनिष्ठेने आम्हास सहा्यय करतील अशी आम्हची उमेद आहे.'' असा निर्धार त्यांनी व्यक्त केला. शिवाजी महारांजांच्या गादीला लाभलेले कतृत्ववान वारस म्हणुन शाहू महाराजांनी लौकीक प्राप्त केला1910 नंतर सत्यशोधक चळवळीने महाराष्ट्रात नवीन जोमाने सुरवात केली. भास्करराव जाधव, मुकुंदराव पाटील, दिनकरराव जवळकर, केशवराव जेधे, रालचंद कोठारी, अन्नासाहेब लठे, केशवराव वडे, भगवंतराव पाळेकर, श्रीपतराव शिंदे, प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे, सिताराम बेले, महाधोराव बागल, बळवंजराव पिसाळ, खंडेराव बागल, बाबुराव यादव इत्यादी

सत्यशोधक-ब्राम्हणेत्तर पुढारी, त्यानी निर्मीलेले साहित्य आणि ते चालवित असलेले वृतपत्रे, ह्यामुळे महाराष्ट्रात समाज प्रबोधनाची चळवळ अधिकाधिक वाढत होती शाहू महाराजांचा राजाश्रय ह्या चळवळीला लाभल्यामुळे चळवळ अधिक व्यापक व प्रगल्भ होत गेली. सोबतच शेतकरी व कामगार वर्गामध्ये जागृती होण्याला ह्याच काळात सुरवात झाली. कामगारांच्या संघटंना उभ्या राहु लागल्या. शाहू महाराजांनी 1908 मध्येच मागासवर्गीयांना आपल्या संस्थानामध्ये 50 टक्के जागा राखीव घोषीत करून नव्या क्रांतीपर्वाला सुरवात केली होती. व्यदोक्त प्रकरणात टिकेचे वार झेलुन शाहू महाराज अधिक सक्षम होत होते. भास्करराव जाधवांसारख्या सत्यशोधकी माणसांशी संपर्क आल्यामुळे फुलेंचे व सत्यशोधक चळवळीचे महत्व पटवुन शाहूनी आपल्या कार्याची दिशा लोकशाहीला समर्पक अशी केली होती. संस्थानातील सर्वच समाज घटकांच्या हितांचे पुरेपुर ध्यान ठेवुन शाहू राज्यकारभार चालवीत होते. बहूजन समाजातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेता यावे म्हणुन वेगवेगळया जातींच्या विद्यार्थ्यांसाठी वसतीगृहे स्थापन केली, होतकरू मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्या दिल्या. बहूजन समाजामध्ये हळूहळू शिक्षणाचा प्रसार होण्याला सुरवात झाली आणि प्रशासकिय नौक-यांसाठी पात्रता धारक विद्यार्थीवर्ग पुढे येवु लागला. शेतक-यांची दैयनिय अवस्था पाहून शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात आधुनिक शेतीच्या संदर्भात नवनविन प्रयोग केले. विदेशातील शेतीविषयक तत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी शेतक-यांना प्रशिक्षण देणे सुरू केले निसर्गावर आधारीत शेती बेभरवशाची असते, शेतीला सिंचनाची सोय असेल तर उत्पनामध्ये लक्षनीय वाढ होवु शकते निसर्गाच्या मर्जीवर चालणारी शेती शेतक-यांच्या जिवाचा घात करते. त्यामुळे जर पाण्याचा प्रश्न मिटला तर शेतक-यांच्या जीवनमानात कमालीचा फरक पडेल हिच संभाव्यतः ओळखुन त्यांनी आपल्या संस्थानात ‘राधानगरी’ धरण बांधुन दुरदृष्टीचा परिचय दिला. नंतरच्या काळात पश्चिम महाराष्ट्रात ‘पाणी अडवा पाणी जिरवा’ योजने अंतर्गत धरणे बांधुन ओसाड जमीनीवर शेती करण्याचा जो यशस्वीप्रयोग झाला त्याची मृहुत मेंढ शाहु महाराजांनी रोवली होती. शेतीमालाची विक्री योग्य भावाने व्हावी, शेतक-याला क्रयविक्रय करतांना लुबाडले

जावु नये म्हणुन बाजारपेठा स्थापन केल्या शेतक-यांना आर्थिक मदत मिळवी ह्या हेतुने सहकारी पतपेढया, बॅकांची स्थापना करून आर्थिक जिवनाला पर्याय उपलब्ध करून दिला. ग्रामीण जिवनाशी संबंधित आणि कृषी समस्यांचे निराकरण होण्याच्या दृष्टीने अनेक योजनांची अबंलबजावणी शाहू महाराजांनी कसोशीने केली. धर्ममार्तंडांच्या विरोधला न जुमानता पुरोगामी विचारांचा धडक प्रचार एका पतळीवर सुरू होता. तर प्रत्यक्ष कृती कार्यक्रम, वेगवेगळया योजना अंमलात आणुन बहूजन समाजामध्ये जागृती निर्माण करणयाचे महत्वाचे कार्य दुस-या पातळीवर सुरू केले.

दिनकराव जवळकर 1929 ला इग्लंडला जाऊन आल्यानंतर, बहूजन समाज, शेतकरी आणि कामगारांच्या राजकीय भवितव्याच्या दृष्टीने ‘शेतकरी पक्ष’ स्थापन करण्याचा मानस त्यांनी सत्यशोधक चळवळीत पुढा-यांजवळ बोलुन दाखविला. सत्यशोधक समाजाचे समाज प्रबोधनाचे कार्य तर चालुच होते परंतु बदलती जागतीक परीस्थिती आणि भारतातील स्वातंत्र चळवळीचा वेग पाहता सत्यशोधक ब्राम्हणेत्तर पुढा-यांना स्वातंन्त्र्यानंतर बहूजन समाजाच्या राजकीय भवितव्या विषयी विचार करणे महत्वाचे वाटत होते. 1919 साली स्वातंत्र्यलढा यशस्वी होण्याची व सत्ता हाती येण्याची चिन्हे दिसु लागताच ब्राम्हणेत्तर श्रेष्ठींच्या सत्ताकांक्षा बळावल्या. केषवराव जेधे आणि शंकरराव मोरे यांनी या बाबत भुमिका मांडुन चळवळीमध्ये राजकीय नेतृत्व उभे करण्याची जाणीव निर्माण केली काही काळ डाव्या विचारसरणीकडेही त्यांचा कल होता. 1937 मध्ये राष्ट्रीय चळवळीशी समेट घडुन ब्राम्हणेत्तर पक्ष कॉग्रेस मध्ये प्रविष्ट झाला. कॉग्रेसमध्ये ज्या अपेक्षांनी ब्राम्हणेत्तर नेते दाखल झाले होते, त्या अपेक्षा, एकुणच कॉग्रेसची विचारसरणी आणि

-----------------------------------------------------

10 कित्ता. पृ.क्र. 82.

11 भाेळे भास्कर लक्ष्मण : शेतकरी कामगार पक्ष, आचार्य पदवी करीता नागपूर विद्यापीठ राज्यशास्त्र विभागात सादर केलेला प्रबंध.1981 पु. 144.

गांधीवादी तत्वे ह्या मुळे भंग झाल्या. अनेक पातळींवर त्यांचे वैचारिक मतभेद निर्माण झाले, विचारसरणीतील तफावतही त्यातुन स्पष्ट होत होती. ब्राम्हणेत्तर नेत्यांना अधिक कणखर भूमिका घ्यावीशी वाटत होती, मतभेद टोकाला गेले. 1948 मध्ये जेध्यांनी आपल्या सहका-यां समावेत कॉंग्रेस त्याग केला आणि 'शेतकरी कामगार पक्ष' (शे.का.प.) स्थापन झाला. मात्र महाराष्ट्रात प्रांतीक कमेटीची व मंत्रीमंडळाची सुत्रे बहूजन नेत्यांकडे सोपवली गेल्याने कॉंग्रेसने विचारसरणीचा गाभा व पक्षीय क्रार्यक्रम पूर्ववत ठेवुन बहूजन समाजाचा पाठींबा मिळविण्यात यश मिळवले. शे.का.प.च्या निर्मीती प्रक्रियेपासुन त्या पक्षाला चिकटलेल्या अनेक अडचणींमुळे फारसी प्रगती झाली नाही. असे असले तरी जाती व्यवस्थेमध्ये बहूजन समाजाला असलेले शुद्र स्थान आणि त्यामुळे हरवुन गेलेले आत्मभान व जिवनावरील विश्वास यावेळी जागे व्हायला सुरवात झाली होती. पूढील काळात महाराष्ट्रच्या राजकीय परिघात शिर्षस्थानी पोहचलेले अनेक राजकीय श्रेष्ठीजन, महाराष्ट्राच्या राजकारणातील बदललेली समीकरणे, बहूजन समाजाचा वाढता राजकीय सहभाग व सत्तासंघर्ष या पार्श्वभुमीवर महाराष्ट्राचा इथपर्यंतचा राजकीय प्रवास महत्वपूर्ण प्रभाव सोडुन जातो. देशाच्या राजकारणात प्रदिर्घकाळात सत्तास्थानी असलेल्या कॉंग्रेस पक्षाला सत्तेपासुन दुर करण्यामागची पार्श्वभुमी सुध्दा अशा विविधांगी राजकीय प्रक्रीयेशी जुळलेली दिसुन येतेमहाराष्ट्रात स्वातन्त्र्योत्तर काळात राजकीय सामाजीकरणाची प्रक्रीया फार वेगाने घडू लागली. शेतकरी, कामगार, दलित, विमुक्त भटकी, आदिवासी या सर्व समाजघटकांना राजकीय परीघामध्ये ओढुन घेण्यासाठी राजकीय पक्षांनी प्रयत्न केले. 'राजकीय भरती' साठी वेगवेगळया माध्यमांचा अवलंब करण्यात आला. वृत्तपत्रे, प्रसार साहित्य, सहकारी तत्वांवर चालणा-या संस्थां या सर्वांच्या माध्यमातुन राजकीय भरतीचे कार्य करण्याकडे राजकीय पक्षांनी अधिक लक्ष केंन्द्रीत केले. 1962 साली महाराष्ट्रात 'पंचायतराज' ने स्थानीक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातुन सत्तेची विकेन्द्रीकरण करून राजकीय भरतीची संधी समाजातील सर्वस्तरातुन उपलब्ध करून दिलीग्रामिण भागातील राजकीय नेतृत्वाला विकासाच्या नव्या संधी उपलब्ध झाल्या कामगार चळवळीतील नेतृत्वालाही राजकारणात स्थान असते हि बुज राखुन

महाराष्ट्राच्या राजकीय पटलावर अनेक नेते आपली चमक दाखवू लागले. राजकीय पक्षांना कामगार आघाडया निर्माण करण्याची आवश्यक्ता भासावी इतका प्रभाव कामगार चळवळींचा निर्माण झाला

संदर्भ ग्रंथ सुचीः

1) कोलारकर, श. गो., 'आधुनिक विदर्भाचा इतिहास' 1857 ते 1947, श्री मंगेश प्रकाशन,नागपूर, 2002.

2) पळशीकर, सुहास; बिरमल, नितीन आणि पवार, प्रकाश (संपा.), 'महाराष्ट्राचे राजकारणः राजकीय प्रक्रियेचे स्थानिक संदर्भ' , प्रतिमा प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, 2007

3) प्रधान, ग. प्र. (संपा.), 'आव्हानांशी संघर्ष आणि परिवत र्नाची दिशा' मा.भाई वैद्य अमृत महोत्सव
गौरव समिती, पुणे. 2003.8

4) भोळे, भास्कर लक्ष्मण, 'विसावे शतक आणि भारतातील समता विचार' , सुगावा प्रकाशन, पुणे2004.

5) चौसाळकर, अशोक, 'धर्म, समाज आणि राजकारण' , लोकवाड्.मय गृह, मुंबई, 2004.

6) कर्णिक, मधु मंगेश (संपा.), 'सांस्कृतिक महाराष्ट्र : 1960 ते 2010', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, 2011.

7) पळशीकर, सुहास आणि कुलकर्णी, सुहास, (संपा.), 'महाराष्ट्रातील सत्तासंघर्षः राजकीय पक्षांची वाटचाल' , समकालीन प्रकाशन, पुणे, 2007.

8) महाराव, ज्ञानेश, 'उठावा महाराष्ट्र देश' , पुष्प प्रकाशन लि. नारायण पेठ, 2001.

9) फडके, य.दि., 'दिनकरराव जवळकर समग्र वाङ्मय' , नविन उद्योग प्रकाशन, पुणे, 2009.

10) राव, राम मेहर सिंह, 'विकास का समाजशास्त्र' , अजुर्न पब्लिशिंग हाऊस, 2007.

11) थापर, रोमिला, 'भारत का इतिहास' , राजकमल प्रकाशन, नवी दिल्ली, अठरावी आवृत्ती,

ISSN: 2348-6449 https://bmb.ac.in/aura/ aurabmb@gmail.com

2003.

12) Sirsikar, V.k~ M., "Political BeÈviour in India", Mankatalsa Publication, Bombay, 1965.k~

13) Bsau, Sajal, "Regional Movements", ManoÈr Publication, New Delhi, 1992.k~

14) Singh, Yogendra, "Modernçation fo Indian Tradition", Rwaat Publications, 1988.k~

15) Bhuyan, Dsaarathi, "Csateism in Indian Politics", Anmol Publications Pvt.k~ Ltd., New Delhi, 2006.k~

16) Tripathi, A.K., "Social and Cultural History fo India", Murari Lal and Sons, New Delhi, 2008.k~